RNI.NO.MAHAR/2013/55083

नि : पक्ष वृत्तपत्र

# संग्राम सत्तेचा

संपादक बाबा ढाकणे

www.sangramsattacha.com




अहिल्यानगर वर्षे १२ अंक ४६ गुरुवार दि.२० फेब्रुवारी २०२५ किंमत २ रु.

# छ.शिवाजी महाराजांना अभिवादन करताना आ. संग्रामभैय्या



छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जयंती निमित्त आमदार संग्राम जगताप, जिल्हाधिकारी सिताराम सालीमठ, जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकरयांच्या हस्ते विधीवत पूजा करून पाळणा गीत सादर केले, पोलीस बँड पथकाने महाराष्ट्र गीत सादर करून पारंपरिक मिरवणुकीला सुरुवात झाली, यावेळी विद्यार्थ्यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन पटावर आधारित देखावे सादर केले होते, लेझीम ढोल ताशाच्या गजरामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाच्या जय घोषाने परिसर दुम-दुमला होता विद्यार्थ्यांची पारंपरिक मिरवणूक नागरिकांचे लक्ष वेधून घेतले जात होते

**संग्राम सत्तेचा वृत्तसेवा**
**ऑनलाईन नेटवर्क**

**अहिल्यानगर : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि आपले आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आपण मोठ्या उत्साहात व पारंपारिक पद्धतीने साजरी करत असतो. जिल्हा मराठा विद्या प्रसारण शिक्षण मंडळाचे विद्यार्थी विविध वेशभूषेध छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य समाजासमोर ठेवण्याचे काम केले जाते, छत्रपती शिवाजी महाराज यांनी रयतेचे राज्य स्थापन करीत समाजाला दिशा देण्याचे काम केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचाराचे अनुकरण करीत आपल्या जीवनाची वाटचाल करावी असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना आमदार संग्राम जगताप समवेत जिल्हाधिकारी सिताराम सालीमठ, जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, प्रांत अधिकारी सुधीर पाटील, आयुक्त यशवंत डांगे, माजी नगरसेवक निखिल वारे, प्रकाश भागानगरे, बाळासाहेब पवार, विश्वासराव आठरे, प्राध्यापक सिताराम काकडे, संजीव भोर, जलअभियंता परिमल निकम सुरेश इथापे, एडवोकेट शिवाजीराव कराळे, शहर अभियंता मनोज पारखे, इंजिनिअर श्रीकांत निंबाळकर, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लाहारे आदीसह शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री विशाल गणेश मंदिराच्या वतीने अभिवादन

छ. शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होते. संपूर्ण जगाला आदर्श राजा म्हणून हेवा वाटावा, असे विलक्षण व्यक्तीमत्व होते. असा हा रयतेचा राजा सर्वांच्या हृदयात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आजही सर्वांना गौरवास्पद वाटावे असेच आहे, असे प्रतिपादन श्री विशाल गणेश मंदिर देवस्थानचे अध्यक्ष ॲड.अभय आगरकर यांनी केले.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर देवस्थानवतीने बसस्थानक चौकातील छ.शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्ष ॲड.अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, विजय कोथिंबिरे, गजानन ससाणे, ज्ञानेश्वर रासकर, चंद्रकांत फुलारी, गणेश राऊत आदी उपस्थित होते.

## भिंगार राष्ट्रवादीच्या वतीने शिवजयंती साजरी

भिंगार शहर राष्ट्रवादीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. भिंगार मारुती मंदिर येथे शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी भिंगार राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संजय सपकाळ, कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी उपाध्यक्ष संभाजीराव भिंगारदिवे, भिंगार छावणीचे उपाध्यक्ष वसंत राठोड, युवकचे शहराध्यक्ष शिवम भंडारी, सुनीलभाऊ कर्डिले, दिलीपराव ठोकळ, दीपक धाडगे, संतोष बोबडे, जनाभाऊ भिंगारदिवे, अशोकराव जाधव, संतोष धीवर, मच्छिंद्र भिंगारदिवे, बाळासाहेब शेकटकर, राजेश तनपुरे, शिवाजीराव बेरड आदींसह राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना कॉपीमुक्तीसाठी आवाहन

## अहिल्यानगरचा कॉपीमुक्ती परीक्षा पॅटर्न राज्याने अंगीकारावा : प्रधान सचिव दराडे




**संग्राम सत्तेचा वृत्तसेवा**
**ऑनलाईन नेटवर्क**

**अहिल्यानगर : राज्याच्या बोर्ड परीक्षेच्या भयमुक्त, कॉपीमुक्त व निकोप वातावरणातील परीक्षा उपक्रमासाठी अहिल्यानगर जिल्ह्याने प्रचंड मेहनत घेतलेली आहे. शिक्षण, पोलीस प्रशासन व महसूल विभागाने समन्वय साधून कॉपीमुक्तीचे केलेले काम राज्याला निश्चितच आदर्श ठरेल आहे. एकाच वेळी ६३ हजार विद्यार्थ्यांचे कॉपीमुक्त परीक्षेचे यशस्वी संचलन ही राज्यासाठी विशेष बाब आहे. विद्यार्थ्यांनी देखील परीक्षांमध्ये कॉपी न करता जीवनात यश संपादन करावे. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ संकल्पनेतील अहिल्यानगरचा आनंददायी परीक्षा पॅटर्न राज्याने निश्चितच अंगीकारण्याचे आवाहन अहिल्यानगरचे पालक सचिव तथा प्रधान सचिव (सहकार व पणन विभाग, मंत्रालय) प्रवीण दराडे यांनी केले.**

जिल्हाधिकारी कार्यालयात विविध बैठकांचे आयोजन दराडे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या दरम्यान त्यांनी कार्यालयातील परीक्षेच्या विशेष वॉर रूमला सुमारे अर्ध्या तासाची विशेष भेट देऊन कॉपीमुक्तीच्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती जाणून घेतली. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, उपजिल्हाधिकारी राहुल पाटील, मनपा आयुक्त यशवंत डांगे, प्रांताधिकारी सुधीर पाटील तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

दहावी- बारावीच्या सर्व पेपरसाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त व शिस्तीसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांचे मार्गदर्शन लाभत आहे. शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या मार्गदर्शनाने कार्यरत जिल्हास्तरीय दक्षता समितीच्या मास्टर प्लॅन अंतर्गत निर्मित या पॅटर्नच्या वेबपेजचे दराडे यांनी विशेष कौतुक केले.

शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी वॉररूमबद्दल व कॉपीमुक्तीच्या जनजागरण उपक्रमाबद्दल माहिती दिली. उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर यांनी १०९ केंद्रातील १५८५ ब्लॉकमधील ६३ हजार विद्यार्थ्यांचे कॉपीमुक्त संचलन कसे होते याचे प्रात्यक्षिक दाखवले. या उपक्रमाची दराडे यांनी विशेष माहिती घेत हा पॅटर्न अजून आदर्श होण्यासाठी मार्गदर्शक सूचना केल्या.

शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे (योजना), शिक्षण निरीक्षक श्रीराम थोरात, सुरेश ढवळे, वॉर्ड रूम संचालक लहू गिरी, जितिन ओहोळ, भावेश परमार, तांत्रिक सहाय्यक डॉ.अमोल बागुल आदींनी यावेळी मॉनिटरिंग उपक्रमात सहभाग दर्शवला.

# न्यूझीलंडची विजयी सुरुवात

## पाकिस्तान पहिल्याच सामन्यात सपशेल अपयशी

**संग्राम सत्तेचा वृत्तसेवा**
**ऑनलाईन नेटवर्क**

**नवीदिल्ली :** पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्या सामन्याने आज (१९ फेब्रुवारी) चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेला सुरुवात झाली आहे. दोन्ही संघांमध्ये कराचीतील राष्ट्रीय स्टेडियमवर सामना पार पडला. या सामन्यात न्यूझीलंड संघाने सुरुवातीला फलंदाजी करताना ३२० धावा केल्या. मात्र प्रत्युत्तरात पाकिस्तान संघ आपल्या सर्व विकेट गमावत फक्त २६० धावाच करू शकली. यासह न्यूझीलंड संघाने ६० धावांनी विजय मिळवत यशस्वी सुरुवात केली. तर दुसरीकडे पाकिस्तानला पहिल्याच सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला.

पाकिस्तानने या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर पाकिस्तानच्या गोलंदाजांनी न्यूझीलंडच्या फलंदाजांना एकामागून एक बाद करत नाणेफेकीचा निर्णय योग्य असल्याचे दाखवून दिले. अवघ्या ७३ धावांवर न्यूझीलंड संघाच्या ३ विकेट पडल्या होत्या. सलामीवीर डेव्हॉन कॉनवे (१०), केन विल्यमसन (१) आणि डॅरिल मिशेल (१०) बाद झाले. मात्र त्यानंतर पाकिस्तान गोलंदाज न्यूझीलंडच्या फलंदाजांवर दबाव कायम राखण्यात अयशस्वी ठरले. विल यंग आणि विकेटकीपर फलंदाज टॉम लॅथम यांनी चौथ्या विकेटसाठी ११८ धावांची भागिदारी केली. विल यंग ११३ चेंडूंत १२ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने १०७ धावा करून बाद झाला.

सहाव्या क्रमाकांवर आलेल्या ग्लेन फिलिप्सने आक्रमक फलंदाजी करत टॉम लॅथमसोबत पाचव्या विकेटसाठी १२५ धावांची भागिदारी केली. ग्रेल फिलिप्स ३९ चेंडूंत ३ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ६१ धावा करून बाद झाला. टॉम लॅथम १०४ चेंडूंत १० चौकार आणि ३ षटकारांच्या मदतीने ११८ धावा करून नाबाद राहिला. **(पान २ वर वृत्त)**

# नगर तालुका कृ.उ.बा.स.च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन



# लाच घेताना जि.प. मा.शि.विभागातील सहा.लेखाधिकारी रंगेहाथ पकडला

**संग्राम सत्तेचा वृत्तसेवा**
**ऑनलाईन नेटवर्क**

**अहिल्यानगर : सेवानिवृत्त शिक्षकाची प्रोव्हिडंड फंडची फाईल पास करण्यासाठी ८ हजार रुपयांची लाच घेताना अहिल्यानगर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागातील सहाय्यक लेखाधिकारी यांना रंगेहाथ पकडण्याची कारवाई अहिल्यानगर लाचलुचपत विभागाच्या टीमने केली आहे. जि.प.माध्यमिक शिक्षण विभागातील सहा.लेखाधिकारी अशोक मनोहर शिंदे असे लाच स्वीकारणाऱ्यांचे नाव आहे. आलेल्या तक्रारीनंतर शहानिशा करुन अहिल्यानगर लाचलुचपत विभागाच्या पोनि छाया देवरे, पोकॉ सचिन सुद्रुक, पोकॉ गजानन गायकवाड आदींच्या टीमने ही कारवाई केली आहे.**

याबाबत समजलेली माहिती अशी की, सेवानिवृत्त शिक्षक सुनील रावसाहेब बंगाळ यांनी प्रोव्हिडंड फंडची फाईल मंजूर करण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागात अनेकवेळा चेकारा मारल्या. पण काम काही झाले नाही. तक्रारदार सुनील रावसाहेब बंगाळ सेवानिवृत्त शिक्षक असून ते दि. ३ जून २०२२ रोजी शिक्षकी नोकरीतून सेवानिवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्त झाल्यानंतर श्री. बंगाळ यांना पेन्शन मंजूर झाली असून ते नियमितपणे मिळत आहे. परंतु श्री बंगाळ हे सेवानिवृत्त झाल्यापासून त्यांना प्रोव्हिडंड फंड आज अखेर मिळालेला नाही. त्याकरीता श्री. बंगाळ हे अहिल्यानगर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग या कार्यालयात काम करणारे अशोक मनोहर शिंदे यांची त्यांच्या कार्यालयात जाऊन पाच ते सहा वेळेस समक्ष भेट घेतली. त्यावेळी अशोक मनोहर शिंदे यांनी तक्रारदार सुनील रावसाहेब बंगाळ यास म्हणाले की, तुमचे काम खूप जुने आहे. तुम्हाला खूप जास्त खर्च लागणार आहे. तुमची फाईल पास करायची असेल तर मला ८ हजार रुपये द्यावे लागतील. याबाबतची तक्रार दि.१८ फेब्रुवारी २०२५ रोजी ला.प्र.वि. अहिल्यानगर येथे प्राप्त झाली होती. त्यानुसार दि.१८ फेब्रुवारी २०२५ रोजी लाच मागणी **(पान २ वर वृत्त)**

# साईभक्तांना एअरगणचा धाक दाखवून लुटणारी टोळी जेरबंद : अ.नगर क्राईम ब्रँच टीमला यश



**संग्राम सत्तेचा वृत्तसेवा**
**ऑनलाईन नेटवर्क**

**शिर्डी : शिर्डी येथे दर्शनासाठी येणारे भाविकांना एअरगणचा धाक दाखवून लुटणारी टोळी पकडण्यात अहिल्यानगर क्राईम ब्रँच टीमला यश आले आहे. या टोळीकडून अहिल्यानगर, घोटी, वैजापूर येथील ४ दरोडयाचे गुन्हे उघडकीस आले असून, ७ आरोपीकडून ९ लाख ६४ हजार रु.किं.मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विजय गणपत जाधव (वय२९, रा.गोंधवणी रोड, वॉर्ड नं.१, श्रीरामपूर,अहिल्यानगर), सिध्दार्थ भाऊसाहेब कदम (वय२९), राहुल संजय शिंगाडे (वय३५), सागर दिनकर भालेराव (वय३०), समीर रामदास माळी (वय २६), (सर्व रा.पोहेगाव, ता.कोपरगाव, जि.अहिल्यानगर), अशी पकडण्यात आलेल्यांची नावे असून, यात दोघेही विधीसंघर्षित बालके आहेत.**

**एसपी राकेश ओला, श्रीरामपूर अपर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे, शिर्डी डिवायएसपी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर क्राईम ब्रँचचे पोनि दिनेश आहेर यांनी दिलेल्या सूचनेनुसार सपोनि हेमंत थोरात, पोलीस अंमलदार गणेश भिंगारदे, बाळासाहेब नागरगोजे, फुरकान शेख, प्रमोद जाधव, बाळासाहेब गुंजाळ, सागर ससाणे, रमीजराजा आत्तार, रोहित येमुल, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, सुनिल मालणकर, प्रशांत राठोड, मेघराज कोल्हे, उमाकांत गावडे व चंद्रकांत कुसळकर आदींच्या टीमने ही कारवाई केली.**

याबाबत समजलेली माहिती अशी की, दि.१६ फेब्रुवारी २०२५ रोजी ६.३० वा.सुमारास कारने प्रवास करत असताना अज्ञात आरोपींनी इर्टिगा कारने आडवून गन, गुप्ती व कोयत्याचा धाक दाखवून सोन्याचे दागिने, मोबाईल मुद्देमाल जबरीने चोरून नेला,या मोहित महेश पाटील (रा.दिंडोली,ता.चौरीयासी, जि.सुरत,गुजरात) यांच्या फिर्यादीवरून कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गुरनं. ४०/२०२५ बीएनएस कलम ३१०(२),१२६ (२),३५२,३५१ आर्म अ‍ॅक्ट ३/२५,४/२५ प्रमाणे दरोडयाचा गुन्हा दाखल होता.

वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना घडलेल्या दरोडयाच्या गुन्हयांची माहिती प्राप्त होताच त्यांनी गुन्हयाचा समांतर तपास करणेबाबत आदेश दिले. त्यानुषंगाने दि.१९ फेब्रुवारी२०२५ ला अहिल्यानगर क्राईम ब्रँच टीमने कोपरगाव तालुका पोलीस ठाणे हद्दीमध्ये तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा शोध घेत असताना माहिती मिळाली की, गुन्हा हा विजय गणपत जाधव (रा.श्रीरामपूर) याने त्याच्या साथीदारासह केला. ते पांढरे रंगाची इर्टिगा कारमधून लासलगाव (जि.नाशिक) येथून शिर्डीच्या दिशेने येत आहेत. तपासी टीमने पंचासमक्ष शिर्डी येथील कारवाडी फाटयाजवळ सापळा रचून वाहनास थांबवून, वाहन चालक व कारमधील सर्वांना ताब्यात घेऊन, त्यांना नावे विचारली असता त्यांनी त्यांची नावे सांगितली. पंचासमक्ष ताब्यातील सर्वांची अंगझडती घेतली असता त्यांचे ताब्यातून ९ लाख रु. किं. पांढरे रंगाची इर्टिगा कार (एमएच ४१, व्ही २८१७), ४५ हजार रु किं.त्यात ३ मोबाईल, ११ हजार रु. किं. त्यात दोन एअर गण, ३ हजार रु. किं., ३ लोखंडी कत्ती, १ हजार रु किं. एअर गण छर्रे असलेली डबी, ४ हजार रु कि. त्यात पिवळया धातुच्या अंगठया व चैन असा एकूण ९ लाख ६४ हजार रु.किं.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **(पान २ वर वृत्त)**